**प्रेसनोट** **दिनांक १८/०७/२०१९**

## डेक्कन पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पोलीस व पोलीस मित्राच्या सतर्कतेमुळे नागरीकाचा हरवलेला मोबाईल फोन परत मिळाला

---

दिनांक १६/०७/२०१९ रोजी ११/१५ वा. दरम्यान दिवसपाळी कर्तव्य असतांना पोलीस मित्र अंगद सुर्यवंशी, रा. १२०२, शिरोळे रोड, एफसी कॉलेज समोर पुणे यास एफ.सी. रोड भागात रेडमी नोट ३ कंपनीचा मोबाईल फोन सापडला. त्यांच्याकडे डेक्कन पोलीस स्टेशन कडील श्री. कौटकर, पोशि ३६३६ यांच्याशी संपर्क साधुन सदर मोबाईल बाबत संपुर्ण माहीती दिली. माहिति प्राप्त होताच सदर ठिकाणी जावुन श्री. कौटकर, पोशि ३६३६ यांनी सदरच्या मोबाईल फोनची पाहणी करुन आपले ताब्यात घेतला. त्यामध्ये सिमकार्ड नसल्यामुळे कोणाचाही नंबर मिळत नसल्याने श्री. कौटकर यांनी Gmail अकाऊंट वरुन व Text message वरील क्रमांकावर संपर्क साधुन मोबाईल मालकाचा संपर्क नंबर प्राप्त करुन मालक श्री राहुल साबळे, रा. तळजाईनगर, पद्मावती पुणे यांना संपर्क करुन त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेवुन मोबाईल बिलाची खात्री करुन मोबाईल परत केला. श्री राहुल साबळे यांना त्यांचा रेडमी नोट ३ मोबाईल फोन परत मिळाल्याने त्यांनी श्री कौटकर पोशि ३६३६ यांचे तसेच पुणे शहर पोलीस दलाचे आभार मानले.

